EBIXCASH

# एचडीएफसी बँक एबिक्सकॅश प्रीपेड कार्डासाठी अर्ज

HDFC BANK
We understand your world

पासपोर्ट आकाराचा फोटो लावून त्यावर तिरपी सही करा.

**अर्जदाराचे नाव**

* स्वत:चे नाव:

वडिलांचे/पतीचे नाव:

आडनाव:

* जन्मतारीख:

* मोबाईल:

* आईचे माहेरचे नाव:

* लिंग: ☐ पु ☐ स्त्री ☐ तृतीय

* **पत्ता** (निवासाच्या पुराव्यावर असलेल्या पत्त्यानुसार)

* शहर/महानगर:

* पिनकोड:

* राज्य:

दिनांक:

*अनुक्रमांक:
(कार्डच्या मागील बाजूवर लिहिलेला, उदा: xxxx xxxx)

ईमेल आयडी:

*कागदपत्रे: कृपया खालील कागदपत्रे सादर करा.

☐ आधार क्रमांक

☐ पॅन क्रमांक किंवा ओव्हीडी

टीप: ग्राहकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी कोणत्याही व्यक्तीकडेत त्यांचा एटीएम/पीओएस/इंटरनेट पिन आणि सीव्हीव्ही उघड करू नये/सांगू नये. एबिक्सकॅश आणि/किंवा एचडीएफसी बँक लिमिटेडला कोणत्याही कारणास्तव गैरप्रकारासाठी किंवा एचडीएफसी बँक एबिक्सकॅश प्रीपेड कार्डच्या दुरूपयोगासाठी जबाबदार धरता येणार नाही. कृपया तुमची पावती गोळा करून भविष्यातील संदर्भासाठी सांभाळून ठेवा.

## आधारसाठी ग्राहकाची संमती

**(ई–ऑथेंटिकेशन)**

मी उपरोक्त आधार क्रमांकाचा धारक असून याद्वारे, एचडीएफसी बँक आणि एबिक्सकॅश ओपन लूप जनरल पर्पज रिलोडेबल (जीपीआर) कार्डसाठी माझी अधिकृतता माझे आधार वापरून इटझ् कॅश कार्ड प्रायव्हेट लिमिटेड (एबिक्सकॅश) यांना अधिकृत करीत आहे आणि यूआयडीएआय (सीआयडीआर) कडून डेमोग्राफिक तपशिलांसह माझ्या वैयक्तिक तपशिलांची प्रतिप्राप्ती करण्यासाठी माझे आधार आणि बायोमेट्रिक/ओटीपी प्राप्त करण्यासाठी माझी संमती देत आहे. मला हे समजलेले आहे की, माझे बायोमेट्रिक्स/ओटीपी माझ्या ओळखीविषयीची माहिती एबिक्सकॅशकडून उपरोक्त हतूसाठी वापरली जाईल. मला हे समजलेले आहे की, माझे बायोमेट्रिक्स/ओटीपी एनक्रिप्ट केलेले आहेत आणि ते साठवले/शेअर केले जाणार नाहीत आणि यूआयडीएआय (सीआयडीआर) यांच्याकडे फक्त ह्याचे हेतूसाठी सादर केले जातील.

**(प्रत्यक्ष आधार)**

मी उपरोक्त आधार क्रमांकाचा धारक असून याद्वारे, एचडीएफसी बँक आणि एबिक्सकॅश ओपन लूप जनरल पर्पज रिलोडेबल (जीपीआर) कार्डसाठी माझी अधिकृतता माझे आधार वापरून इटझ् कॅश कार्ड प्रायव्हेट लिमिटेड (एबिक्सकॅश) यांना अधिकृत करीत आहे. यूआयडीआयने पुरविलेली आधारची प्रत्यक्ष प्रत जमा करण्यासाठी मी माझी संमती देत आहे. आधारची प्रत देण्याचा आणि अर्जावर सही करण्याचा हेतू मला समजतो. मला एबिक्सकॅशची घोषणा समजते की, माझ्या ओळखीविषयीची माहिती फक्त उपरोक्त हेतूसाठीच एबिक्सकॅशकडून वापरली जाईल.

ग्राहकाची सही

## घोषणा

एचडीएफसी बँक एबिक्सकॅश प्रीपेड कार्डचा वापर, नियम आणि टी आणि इतर वैधानिक आवश्यकतांसाठी लागू असलेले नियम आणि मी वाचलेल्या असून मला त्या समजलेल्या आहेत. मला हे समजते की, या बाबतीत लागू असलेल्या नियम आणि अटींमध्ये काही बदल/अद्ययावत माहिती असल्यास ती इट्झ कॅश कार्ड लिमिटेडच्या www.ebixcash.com ह्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल आणि ती माझ्यावर बंधनकारक राहील. मी याद्वारे घोषित करतो/ते की, ह्या अर्जात दिलेले तपशील आणि माहिती (आणि यात उल्लेख केलेली आणि सोबत दिलेली सर्व कागदपत्रे) सर्व बाबतीत खरी, अचूक, पूर्ण आणि आद्ययावत आहेत. मला हे समजते की, मी दिलेली माहिती ही बँकिंग कंपन्यांचा कारभार चालविण्यासाठीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक आहे. इट्झ कॅश कार्ड लिमिटेड आणि/किंवा एचडीएफसी बँक लिमिटेड (''एचडीएफसी बँक''/''बँक'') किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांना जेव्हा आवश्यक असेल, त्यानुसार कोणतीही अतिरिक्त माहिती/दस्तऐवज पुरविण्याची हमी मी देत आहे. ह्या अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे खरी आहेत आणि ह्या अर्जात दिलेली माहिती कोणताही अधिनियम, नियम, विनियम किंवा कायद्याच्या किंवा कोणत्याही सरकारने किंवा वैधानिक प्राधिकरणाने वेळोवेळी जारी केलेल्या अधिसूचनेच्या, निर्देशांच्या विरुद्ध नाहीत. ह्या अर्जात दिलेल्या माहितीती कोणताही बदल झाल्यास मी त्याबद्दल तातडीने इट्झ कॅश कार्ड लिमिटेड (एचडीएफसी बँकेचे बिझिनेस करस्पाँडंट), टॉप १४वा मजला, टाईम्स टॉवर, कमला सिटी, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई – ४०० ०१३ यांना कळवीन आणि मी दिलेल्या माहितीच्या आधारे इट्झ कॅश कार्ड लिमिटेड आणि/किंवा एचडीएफसी बँक यांनी केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा केलेल्या कारवाईमुळे झालेल्या कोणत्याही तोट्यास, खर्चास, हानीस, तसेच मी माहिती न दिलस/अशा प्रकारच्या बदलांविषयी कळविण्यास दिरंगाई केल्यास ते जबाबदार असणार नाहीत हे मी मान्य करतो/ते. मी हे कार्ड भारतीय रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेल्या मर्यादांमध्ये आणि संकेतस्थळावर व्यापाऱ्यांनी उल्लेख केलेल्या उत्पादनांसाठी/सेवांसाठी निर्धारित व्यापाऱ्यांबरोबरच्या व्यवहारांसाठी वापरण्याचे मान्य करतो/ते आणि त्यापुढे मान्य करतो/ते की याचा वापर मी कोणत्याही बेकायदेशीर हतूसाठी/कामांसाठी करणार नाही. मी ह्या कार्डचा वापर करून कोणत्याही बेकायदेशीर/गुन्हेगारी स्वरूपाच्या/काळा पैसा पांढरा करण्याच्या कामांना प्रोत्साहन देण्यासाठी किंवा त्यातील एक पक्ष बनण्यासाठी करणार नाही. मी हे मान्य करतो/ते आणि मला समजते की, इट्झ कॅश कार्ड लिमिटेड आणि/किंवा एचडीएफसी बँक कोणतेही कारण न देता किंवा मला न सांगता हा अर्ज नाकारण्याचा अधिकार स्वत:कडे राखून ठेवीत आहे. मी दिलेली केयासी कागदपत्रे जर एचडीएफसी बँकेला आवश्यक असल्यानुसार नसतील, तर इट्झ कॅश कार्ड लिमिटेड आणि/किंवा एचडीएफसी बँक यांच्याकडून आवश्यक ती कारवाई केली जाईल हे मी मान्य करतो/ते. मी हे मान्य करतो/ते आणि मला समजते की, हा अर्ज आणि त्यासोबत दिलेली कागदपत्रे व फोटोग्राफ्स स्वत:कडे ठेवण्याचा अधिकार एचडीएफसी बँक स्वत:कडे राखून ठेवीत आहे आणि ते मला परत केले जाणार नाहीत. प्रक्रिया केलेली माहिती/डेटा/तिचे उत्पादन इतर बँकांना/वित्तीय संस्थांना/कर्ज देणाऱ्यांनी/कोणत्याही वैधानिक आणि नियामक प्राधिकरणांना देण्याबद्दल मी इट्झ कॅश कार्ड लिमिटेड आणि/किंवा एचडीएफसी बँक यांना जबाबदार धरणार नाही.

मी/आम्ही याद्वारे, माझ्या/आमच्याविषयीचा वैयक्तिक डेटा आणि संवेदनशील माहिती, केवायसीशी संबंधित माहिती, कागद आणि डेटा, पतविषयक माहिती आणि इतर माहिती, मग ती माझ्या/आमच्याविषयी असेल किंवा नसेल, ती (एकात्रितरीत्या ''माहिती'') बँकेला संबंधित वाटेल त्यानुसार तिच्या हेतूंसाठी, खालीलपैकी काहीही करण्यास किंवा हाती घेण्यास बँकेला (स्वत: बँकेला किंवा तिच्या कोणत्याही सेवा प्रदात्यांच्या माध्यमातून, आणि ऑटोमॅटेड पद्धतीने किंवा अन्यथा) घेण्यास स्पष्टपणे संमती देत आहे/आहोत.

१) माझ्याकडून आणि इतर प्रत्यक्ष किंवा ही माहिती क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्या, संकेतस्थळे, डेटा बेसेस आणि ऑलाईन प्लॅटफॉर्मस् (सार्वजनिक असले किंवा नसले तरी) ऑनलाईन साधनांकडून माहिती गोळा करणे; ऑनलाईन डेटा बेसेससहित कोणत्याही स्रोतांकडून आणि व्यक्तींकडून माहितीची अधिकृतता, अचूकता, पुरेसेपणा, इत्यादी प्राप्त करणे; आणि अशा प्रकारे ॲक्सेस मिळविण्यासाठी, माहिती गोळा करण्यासाठी किंवा पडताळून पाहण्यासाठी, ज्यात माझा/आमचा लॉग आणि पासवर्ड ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर वापरणे यासाठी माझ्यावतीने काम करणे; अशा प्रकारे माहिती गोळा करणे, ॲक्सेस करणे आणि पडताळणी करणे हे मला/आम्हाला सांगून किंवा न सांगता केले जाऊ शकते;<br>
२) माहिती साठवून, तिची रचना करून, संकलित करून, पुन्हा उपलब्ध करून, तिची नक्कल करून, वापर करून, प्रोफायलिंग, इत्यादी करून त्या माहितीवर प्रक्रिया करणे:<br>
३) करारासाठी, कायद्यानुसार किंवा बँकेच्या पुराव्यासाठी आणि दाव्यासाठी यापैकी जे दीर्घकाळ असेल त्यासाठी अशी माहिती साठवून ठेवणे;<br>
४) ही माहिती सेवाप्रदाते, सल्लागार, क्रेडिट इन्फॉर्मेशन कंपन्या, इतर बँका आणि वित्तीय संस्था, संलग्न संस्था, दुय्यम अंगभूत संस्था, नियामक प्राधिकरणे, अन्वेषण अभिकरणे, न्यायिक, अर्ध–न्यायिक आणि वैधानिक प्राधिकरणे किंवा इतर व्यक्ती यांना, करारातील अटींनुसार किंवा कायदेशीर आवश्यकतांनुसार किंवा बँकेच्या कायदेशीर हितसंबंधांसाठी किंवा दिलेल्या संमतीनुसार शेअर करणे किंवा उघड करणे;<br>
५) उपरोक्तपैकी कशाचाही वापर बँकेकडून वर उल्लेख केलेल्या हेतूंसाठी, क्रेडिट अप्रेजलसाठी, फसवणूक शोधून काढण्यासाठी, काळ्या पैशाविरोधातील जबाबदारी म्हणून, करार करण्यासाठी, थेट विपणनासाठी, क्रेडिट स्कोअरिंग मॉडेल्स आणि बिझिनेस स्ट्रॅटेजीज् विकसित करण्यासाठी, देखरेख करण्यासाठी, सेवा आणि उत्पादने यांच्या गुणवत्तेच विश्लेषण करून सुधारणा करण्यासाठी, इतर कायदेशीर हेतूंसाठी किंवा संमती घेऊन कोणत्याही हेतूसाठी केला जाईल.<br>
मी/आम्ही उघडपणे मान्य करतो आणि मला/आम्हाला बँकेकडून किंवा बँकेच्या वतीने ऑटोमेटेड प्रोसेसिंग, ऑटोमेटेड प्रोफायलिंग आणि ऑटोमेटेड डिसिजन मेकिंगसाठी प्रयुक्त करण्याचे मान्य करतो.<br>
मी/आम्ही बँकेला किंवा त्यांच्या सहयोगींना ही माहिती वापरण्यास आणि पुन्हा मला/आम्हाला त्यांची विविध उत्पादने आणि सेवा वेळोवेळी विकण्यास उघडपणे मान्यता देतो.

ग्राहकाची सही

आऊटलेटचा शिक्का आणि सही

---

**पावती**

अनुक्रमांक:

प्राप्त झालेली रक्कम:

दिनांक:

आऊटलेट कोड:

आऊटलेटची सही/शिक्का

आऊटलेटचे नाव: ____________________

ठिकाण: ____________________

# महत्त्वाचे नियम आणि अटी

हे एचडीएफसी बँक एबिक्सकॅश प्रीपेड कार्ड तुम्हाला कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत बँकिंग कंपनी म्हणून स्थापन करण्यात आलेल्या आणि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ अंतर्गत एक बँक असा अर्थ असलेल्या एचडीएफसी बँक लिमिटेड (''एचडीएफसी बँक'') यांच्याकडून देण्यात येत आहे, जिचे नोंदणीकृत कार्यालय एचडीएफसी बँक लि., वन इंडियाबुल्स सेंटर, टॉवर २बी, ६वा मजला, ८४१, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (प.), मुंबई ४०० ०१३ येथे आहे. इट्झ कॅश कार्ड लिमिटेड (''एबिक्सकॅश'') ही कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत स्थापन करण्यात आलेली कंपनी, जिचे नोंदणीकृत कार्यालय टॉप १४वा मजला, टाईम्स टॉवर, कमला सिटी, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०० ०१३ येथे आहे. एबिक्सकॅशची नियुक्ती एचडीएफसी बँकेने एचडीएफसी बँक एबिक्सकॅश प्रीपेड कार्डसाठी बिझिनेस करस्पाँडंट आणि प्रोग्रॅम मॅनेजर म्हणून केलेली आहे.

**(नियम व अटी)** हे नियम आणि अटी आणि एबिक्सकॅश संकेतस्थळावर म्हणजेच www.ebixcash.com वर उल्लेख केलेले नियम आणि अटी यांच्यासह कोणत्याही जोडलेल्या किंवा सोबतच्या पूरक अटींसह (एकत्रितपणे ''नियम आणि अटी'') तुम्ही एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक आणि ग्राहक यांच्यामधील कराराच्या अनुषंगाने धारण केलेल्या (कार्डधारक) एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकेच्या को–ब्रँड प्रीपेड कार्डचा (''कार्ड'') उपयोग कसा करावा हे सांगतात. कार्डधारक याद्वारे या नियमांचे आणि अटींचे पालन करण्याचे मान्य करतो/ते आणि कार्डधारकाने कार्डच्या साह्याने व्यवहार करून किंवा कार्डची लेखी पावती देऊन किंवा कार्डच्या मागील बाजूस सही करून हे नियम आणि अटी विनाशर्त स्वीकारण्याचे मान्य करतो/ते आणि त्याने/तिने सर्व नियम आणि अटी वाचलेल्या आहेत आणि त्याला/तिला त्या समजलेल्या आहेत असे समजण्यात येईल. ह्या कार्डच्या उपयोगासंबंधीच्या संबंधित अधिसूचना/मार्गदर्शक सूचना/परिपत्रके यांमधील बदल/सुधारणा यांच्याबाबतीत स्वत:ला अद्ययावत ठेवणे यासाठी कार्डधारक जबाबदार असेल. कार्डच्या उपयोगाशी संबंधित वेळोवेळी लागू असलेल्या अधिसूचना/मार्गदर्शक सूचना/परिपत्रके यांच्या पालनाचे उल्लंघन झाल्यास त्यासाठीची जबाबदारी बँक स्वीकारत नाही. नियम आणि अटी जर स्वीकाराई नसतील, तर कार्डधारकाने कार्डचा उपयोग करता कामा नये आणि तात्काळ हे कार्ड एबिक्सकॅश/एचडीएफसी बँकेला परत करावे.

**(कार्ड खात्याचे तपशील पाहणे)** शिल्लक रकमेसह (''कार्ड बॅलन्स'') कार्डसंबंधी माहिती www.ebixcash.com वर योग्य प्रकारे लॉग–ईन केल्यानंतर किंवा ग्राहक सेवा केंद्राला कॉल दूरध्वनी क्रमांकावर करून/कार्डच्या मागे लिहिलेल्या ई–मेल पत्त्यावर मेल लिहून ॲक्सेस केला जाऊ शकतो.

**१. उपयोग, मर्यादा आणि सुरक्षितता**

(वापर) कार्ड जारी करणे आणि त्याचा वापर करणे हे एचडीएफसी बँकेने वेळोवेळी जारी केलेल्या नियम आणि विनियमांच्या अधीन आहे. कार्डधारकाने कार्डचा उपयोग व्यापाऱ्यांकडून भारतीय रुपयात वस्तू विकत घेण्यासाठी किंवा सेवा प्राप्त करण्यासाठी फक्त भारतात करावयाचा आहे.

(हस्तांतरणीयता) हे कार्ड कार्डधारकाकडून हस्तांतरणीय किंवा दुसऱ्याला सोपवण्याजोगे नाही.

(हरवलेली आणि चोरीस गेलेली कार्डस्) जर कार्ड किंवा त्याना पिन हरवला, चोरीला गेला किंवा त्याचा गैरवापर झाला, तर कृपया तात्काळ ग्राहक सेवा केंद्राशी (''ग्राहक सेवा केंद्र'') कार्डच्या मागील बाजूस दिलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधा. तुम्ही पिन लक्षात ठेवायला हवा आणि पिन मेलर तात्काळ नष्ट करायला हवा. असे कार्ड २४ तासांच्या आत ब्लॉक करण्यात येईल आणि तुम्ही कार्ड हरवल्याची माहिती दिल्यापासून तुमच्या पैशांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सुरू होते. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक स्वत:च्या विवेकाधिकाराने आणि कार्डधारकाच्या ओळखीची पडताळणी केल्यानंतर निर्धारित शुल्क आकारून हरवलेल्या कार्डच्या बदल्यात नवीन कार्ड जारी करू शकेल.

(कायदेशीर तरतूद) कार्डधारकाने हे कार्ड फक्त कायदेशीर हेतूसाठी कायदेशीर पद्धतीने वापरले पाहिजे.

(तृतीय पक्षाकडून वापर) अनधिकृत वापरापासून कार्डधारकाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी असा सल्ला देण्यात येतो की, तुम्ही हे कार्ड सदैव तुमच्या ताब्यात ठेवावे.

(जबाबदारी) कार्डधारकाला प्राप्त झालेल्या वस्तू किंवा सेवा, त्यांचा दर्जा, मूल्य, वॉरंटी, डिलिव्हरीत झालेला विलंब, डिलिव्हरी न मिळणे, कोणत्याही वस्तू किंवा सेवा प्राप्त न होणे यांसह कोणत्याही बाबतीतल्या विवादासाठी बँक किंवा एबिक्सकॅश जबाबदार असणार नाहीत. हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे की, हे कार्ड म्हणजे कार्डधारकाला व्यापाऱ्यांना मालाचे पैसे देण्याची सुविधा पुरविण्यासाठी आहे आणि बँक वस्तू किंवा सेवा यांसाठी कोणतीही वॉरंटी देत नाही किंवा दर्जा, प्रमाण, मूल्य, डिलिव्हरी किंवा अन्यथा प्रतिनिधित्व करीत नाही आणि अशा प्रकारचा कोणताही विवाद कार्डधारक आणि व्यापारी यांनी थेटपणे सोडवावा.

(कार्ड बॅलन्समधील बदल) व्यवहार परत फिरवल्यास ग्राहकाला कार्डखात्यात पैसे जमा केले जाऊ शकतात, कार्डधारकाला रोख रक्कम परत केली जाणार नाही. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक पैसे परत करताना संबंधित व्यापाऱ्याने लादलेले लागू असलेले आकार वसूल करील.

(व्यवहाराची मर्यादा) एबिक्सकॅश, एचडीएफसी बँक आणि/किंवा विक्रीच्या ठिकाणचे व्यापारी पैशाच्या रकमेवर आणि कार्डच्या माध्यमातून परवानगी देण्यास आलेल्या व्यवहारांच्या संख्येवर ठरवून दिलेल्या कालावधीत मर्यादा (''ट्रँझॅक्शन लिमिटस्'') ठरवून देऊ शकतात. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक कोणत्याही वेळी व्यवहारांवरील मर्यादांमध्ये कोणत्याही कारणास्तव सुधारणा करू शकतात. कार्डधारक हे बदल ऑनलार्सन Ebixcash.com वर व्ह्यू करू शतील किंवा ते ग्राहक सेवा केंद्रालाही कॉल करू शकतात. लागू असलेल्या कायद्यानुसार कार्डधारकाला कळविले जाईल.

**२. कार्डची मुदत संपणे, ते रद्द होणे आणि खंडित करणे**

तुम्हाला देण्यात आलेले कार्ड जारी केल्याच्या तारखेपासून पाच (५) वर्षांसाठी वैध आहे. ह्या कार्डवर उल्लेख केलेल्या तारखेला त्याची मुदत संपेल. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक पुढील घटना घडल्यास तात्काळ कार्ड रद्द करू शकेल किंवा त्याचे निलंबन करू शकेल: (१) कार्डधारकाने कार्ड हरवल्याची सूचना दिल्यास. (२) सलग ९० दिवस कार्डचा उपयोग न केल्यास (३) ९० दिवसांपर्यंत कार्डमध्ये शिल्लक रक्कम नसल्यास (४) कार्डधारकाकडून कोणत्याही प्रकारे नियम व अटींचा भंग केला गेल्यास (५) कॉर्पोरेटकडून कार्ड रद्द किंवा निलंबित करण्यासाठी विशिष्ट प्रकारची विनंती केली गेल्यास, किंवा (६) रद्द किंवा निलंबित केलेल्या कार्डसाठीच्या पैशांवर प्रक्रिया करणे, किंवा (७) एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक हे त्यांच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे, ज्यात कायद्याने घातलेल्या बंधनांचा आणि इतरही कारणांचा समावेश असेल, अशा कारणांसाठी कार्डसंबंधी प्राप्त झालेल्या पैशांवर पक्रिया करण्यास असमर्थ असतील.

**३. कार्ड बॅलन्स**

(कार्ड बॅलन्स) कार्डधारक कार्डाचा योग्य आणि नीट वापर करून नियम आणि अटींनुसार कार्ड बॅलन्सचा वापर करू शकतात. कार्डधारकाला कोणतेही व्याज देय नसेल. कार्डधारकांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी आवश्यकती खरेदीची रक्कम/सेवा प्राप्त करण्यासाठी, लागू असलेल्या आकारांसह व्यवहार करावा, अन्यथा असा व्यवहार मान्य केला जाणार नाही.

(अनियमितता) मर्चंट एस्टॅब्लिशमेंटमधील व्यवहारांच्या तपशिलांमध्ये जर काही अनियमितता किंवा त्रुटी असतील, तर कार्डहोल्डर एबिक्सकॅशला त्याविषयी व्यवहार केल्यापासून ०७ दिवसांच्या आत कळवतील. ह्या कालावधीत जर कोणतीही सूचना प्राप्त झाली नाही, तर एबिक्सकॅश व्यवहार बरोबर होता असे समजेल.

**४. शुल्क आणि वापरावरील कर**

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक यांना देय असलेले सर्व शुल्क आणि आकार एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक कार्ड बॅलन्समधून वजा करून घेतील.

**५. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक यांची जबाबदारी**

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक यांची जबाबदारी कोणत्याही वेळी कार्डमध्ये असलेल्या रकमेपुरतीच मर्यादित आहे.

**६. डेटाचे संरक्षण**

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक कार्ड पुरविण्यासाठी ग्राहकाच्या सूचनांनुसार, कार्डचे संचालन करण्यासाठी, कार्डसंबंधी आणि त्याच्या उपयोगासंबंधी कार्डधारकाच्या शंकांचे निरसन करण्यासाठी, सांख्यिकीय आणि नियामक माहिती पुरविण्यासाठी आणि गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कार्डधारकाच्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यासाठी करतील.

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक कार्डधारकाची माहिती इतर कंपन्यांना आणि तृतीय पक्षांना, ज्यात ॲप्लिकेशन प्रोसेसिंग पुरविण्यासाठी, गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी, ग्राहक सेवेसाठी, कार्डची निर्मिती आणि तंत्रज्ञान प्रक्रिया सेवांसाठी यांचाही समावेश आहे, गोपनीय रितीने आणि लागू असलेल्या डेटा प्रक्रिया आणि बँक गुप्तता कायद्यांनुसार  परवानगी असलेल्या मर्यादेपर्यंत इतर कंपन्यांना आणि तृतीय पक्षांना आणि त्यांचे अभिकर्ते, उपठेकेदार यांना देईल.

एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक कार्डधारकाचा वैयक्तिक डेटा यांच्याकडे कदाचित उघड करतील: (१) ग्राहक, (२) जर खोटी किंवा चुकीची माहिती पुरविली गेली आणि गैरप्रकाराचा संशय आला, तर फ्रॉड प्रिव्हेन्शन एजन्सीज्ना, आणि (३) जेथे लागू असलेल्या कायद्यांनुसार किंवा न्यायालयाच्या आदेशानुसार आम्हाला असे करण्याची आवश्यकता असेल, तेव्हा वैधानिक/नियामक प्राधिकरणे, कायदा अंमलबजावणी किंवा गैरप्रकारांना आळा घालणाऱ्या एजन्सीज् यांना. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक उच्च दर्जाच्या सेवा कायम राखण्यासाठी आणि सुरक्षिततेसाठी, डेटा गोळा करण्यासाठी आणि प्रशिक्षणाच्या हेतूने किंवा लागू असलेल्या कायद्यानुसार, दूरध्वनी कॉल्सवर लक्ष ठेवू शकतील आणि/किंवा कॉल रेकॉर्डिंग करू शकतील. सर्व रेकॉर्डिंग्ज एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक यांच्या मालकीच्या आहेत. कार्डधारक त्यांच्या वैयक्तिक डेटावर प्रक्रिया करण्यास (हस्तांतरित करण्यासह) एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक आणि वर उल्लेख केलेले इतर प्राप्तकर्ते यांना वर म्हटलेल्या हेतूंसाठी संमती देत आहे.

**७. संकीर्ण**

(सुधारणा) एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक ग्राहकाला कोणतीही सूचना न देता लागू असलेल्या कायद्याच्या अधीन राहून कोणत्याही वेळी कोणतीही तरतूद बदलू किंवा काढून टाकू शकतील, कोणतेही आकार जोडू किंवा बदलू (वाढविण्यासहित किंवा कमी करण्यासहित) शकतील. असे बदल ऑनलाईन www.ebixcash.com वर उपलब्ध करून दिल्यानंतर २४ तासांनंतर ते कार्डधारकाने पाहिलेले आहेत असे समजण्यात येईल. एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक कोणत्याही अटींमध्ये सुधारणा करण्याचे हक्क स्वत:कडे राखून ठेवीत आहेत.

(लागू असलेला कायदा) हे नियम आणि अटी आणि याअंतर्गत उद्भवलेली सर्व प्रकरणे यांना भारतीय कायदा लागू होईल आणि कार्डधारक आणि एबिक्सकॅश/एचडीएफसी बँक असे दोन्ही पक्ष मुंबईतील न्यायालयांचे कार्यक्षेत्र मान्य करीत आहेत.

**८. हेल्पलाईन**

आम्हाला आमच्या ग्राहक सेवा केंद्रामध्ये ७६६६१५५२२० ह्या क्रमांकावर कॉल करा किंवा care@ebixcash.com वर आम्हाला ई–मेल पाठवा किंवा आम्हाला इट्झ कॅश कार्ड लिमिटेड, टॉप १४वा मजला, टाईम्स टॉवर, कमला सिटी, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई ४०० ०१३ येथे लिहून कळवा.